## **डॉ. सुप्रिया लोणकर** (एमबीबीएस, डीपीएम)



डॉ. सुप्रिया लोणकर, एमबीबीएस, डीपीएम, अमरावती व मुंबईतून पूर्ण केले. त्या मनोविकारतज्ञ म्हणून गेली ११ वर्षे कार्यरत आहेत. नित्यानंद सोबत २००८ पासून काम करत आहेत. येथे त्या औषधोपचार तसेच मनोविकार झालेल्या व्यक्तींच्या पालकांची उपचारपश्चात काळजी कशी घ्यावी याबद्दल त्या कार्यशाळा हि घेतात.

प्रांजलीला तिचा भाऊ, पोलिसांच्या मदतीने नित्यानंदमध्ये ॲडमिशनसाठी घेऊन आल होता. काऊन्सेलर व डॉक्टराशी पहिली भेट जेव्हा झाली तेव्हा भेटताच प्रांजली खूप बडबड करायला लागली. आम्हाला भेटून तिला किती आनंद झाला हे ती मोठ्यांनी सांगू लागली, आम्ही आमची नावे सुद्धा तिला सांगितली नसताना. दागिने वगैरे घालून ती खूप नटून थटून आली होती. तिचे हावभाव खूप चंचल व अस्वस्थ होते. आमच्याविषयी बोलता बोलता ती अचानक तिच्या नातेवाईकांविषयी बोलू लागली, त्यावरून तिने विषय बदलून शेतीविषयी बोलायला सुरुवात केली. एका विषयावर ती जात असल्यामुळे, तिच्या बोलण्याचा अर्थ आम्हाला लागत नव्हता. मध्ये तिने खुशीने हसत गाणे गुणगुणायला सुरुवात केली. या खुशीचे कारण तिला विचारलं असता तिने माझ्यात खूप मोठी दैवी शक्ती आहे, माझ्यावर देवाची खूप कृपा आहे, मला सगळ ज्ञान आहे, मी काहीही करू शकते अश्या अनेक गोष्टी सांगितल्या. पण अचानक सावध होत तिने लोकांना तिचं कसं वाईट करायचं आहे किंवा ते तिच्या विषयी कसे वाईट बोलतात, वाईट विचार करतात हे ही बोलून दाखवले. तिच्यातील दैवी शक्ती काढून घेण्यासाठी लोक तिचा पाठलाग करत असावेत अशी भीतीही तिने व्यक्त केली. या माहिती व्यतिरिक्त तिच्या आजाराची व्यवस्थित माहिती घेण्यासाठी तिला मध्ये थांबवून, मी भावाकडून माहिती घ्यायला सुरुवात केली.

प्रांजली जेमतेम ९ व्या इयत्तेपर्यंत शिकण घेतलेली मुलगी, अभ्यासात रस नसल्यामुळे तिने शिक्षण सोडले. घरकाम, विणकाम, शिवणकाम, या गोष्टी तिला आईने शिकवल्या. या गोष्टीच्या आधारे तिचं जीवन व्यवस्थित चालू होतं. वयाच्या २३ व्या वर्षी वडिलांनी तिच्यासाठी मुलगा पसंत केला आणि तिचे लग्न करून दिलं. लग्नानंतर तिच्यावर जबाबदारी पडेल आणि त्यानंतर ती सुधारेल अशी आशा त्यांना होती. पण लग्नानंतर नवरा दारु पिऊन खूप त्रास देऊ लागला. पण प्रांजली कधीच माहेरी या विषयी बोलली नाही. ती सगळं सहन करत राहिली. मुल व्हावे म्हणून तिला सासर व माहेर दोन्हीकडून ऐकवले जात होते. गर्भधारणेला अडचणी येऊ लागल्या म्हणून तपासण्या केल्या असता अंडाशय वाहिका बंद असल्यामुळे तिला मुल होण्यास त्रास होत होता. इतका त्रास होत असल्याने ती सतत दु:खी राहायची, खूप रडायची, जेवण व झोप घ्यायची नाही, कोणाशी बोलायची नाही. खूप उदास होत चालली होती. मुल व्हावे म्हणून उपचार घेत असताना ती काही काळ माहेरी राहिली. या दरम्यान तिचा नवरा पण काही काळ सोबत राहत असे. पण दारु पिऊन तिच्या नवऱ्याचा तिच्यावर होणारा अत्याचार प्रांजलीला सहन होत नसल्याने तिच्या आई वडिलांना जाणवले. तिची बिघडलेली मनस्थिति बघून घरच्यांनी अखेर डीवोर्सचा निर्णय घेतला.

डीवोर्ससाठी कोर्टात खेपा सुरू झाल्या. आपल्यामुळे घरच्यांना होणारा त्रास होतो आहे आणि आपले लग्न आपणच टिकावू शकलो नाही, मुलाला जन्म देऊ शकलो नाही. या विचारांनी प्रांजलीचे डिप्रेशन वाढत गेले. तिच्या आसपासच्या इतर मुलींची सुरळीत आयुष्य पाहून हि भावना वाढतच गेली. मनात आत्महत्येचे विचार चालू झाले. जसा मनस्ताप सहन होण्यापलीकडे गेला तिसऱ्या मजल्यावरून तिने उडी मारण्याचा प्रयत्न केला. परंतु शेजारील लोकांच्या प्रसंगावधानमुळे ती वाचली. ह्या घटनेमुळे तिच्या आईवडिलांना धक्का बसला आणि त्यांनी तिला मानसोपचारतज्ञांकडे नेण्याची तयारी केली. मानसोपचारतज्ञांनी तिला डिप्रेशनसाठी ट्रिटमेंट चालू केली. परंतु ती सतत झोपून राहत असे. तिच्यात थोडी सुधारणा होती परंतु म्हणावी तशी नव्हती म्हणून डॉक्टरांनी गोळ्या बदलून दिल्या. तेव्हा प्रांजली अचानक खूप काम करायला लागली, पूर्णपणे निद्रनाशच झाला, बडबड वाढली, फिरणे खूप वाढले, अवास्तव बोलणे. ती खूप सैरभैर झाली होती. तिने डीवोर्सचे पेपर फाडले व कोणालाही न कळवता अचानक नवऱ्याकडे निघून गेली. माहेरच्यांनी तिला परत आणण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिच्या सासरच्या लोकांनी पोलीस बोलावून तो हाणून पाडला. तश्याच सैरभेर स्थितीत ती नवऱ्याबरोबर राहू लागली. तिथे पूर्वीप्रमाणे तिचा छळ होत गेल्याने तिची ही लक्षणे वाढतच गेली शिवाय नवीन लक्षणे दिसू लागली. स्वत:शी पुटपुटणे, हातवारे करत कोणत्या अदृश्य व्यक्तीशी बोलणे, दिनचर्या अस्ताव्यस्त, औषधे पूर्णपणे बंद होती. एक दिवस ती नवऱ्याचे घर सोडून अचानक निघून गेली. सासरच्यांनी तिच्या घरी कळवले तसा तिचा शोध चालू झाला. काही दिवसानंतर अमृतसर पोलीस स्टेशन मधून तिच्या भावाला फोन आला. प्रांजली अमृतसरला पोहोचल्याचे कळले. प्रांजलीच्या वडिलांनी तिच्या भावाला पाठवून तिला परत आणले. तिथे तिची स्थिती अशी होती की भावाला तिला हाताळणे एकट्याने शक्य झाले नव्हते. त्याने पोलिसांची मदत मागितली. पोलिसही मदतीला धावून आले.

तिला घरी आणल्यावर तिची अवस्था पाहून घरातल्या कोणालाच तिला कसे सावरावे ते कळेना. तिच्या मामांना मानसिक आजार होता तेव्हा त्यांच्या अनुभवावरून तिच्या कुटुंबांनी नित्यानंद येथे तिला भरती करण्यासाठी आणले. तिचा राग आणि संशय इतका वाढलेला होता की, आई वडिलांवर धावून जाऊ लागली होती. नित्यानंदमध्ये भरती करण्याकरताही पोलिसांची मदत घ्यावी लागली. पोलिसांनीच तिला इथे बरी होईपर्यंत राहावे लागणार आहे असे प्रांजलीला सांगितले.

जसे जसे उपचार चालू झाले तशी लक्षणे कमी होत होती. तिचे भाचे, संशय कमी झाले, आई वडिलांच्या प्रती असलेला राग कमी झाला. रोज डॉक्टर व काऊन्सेलर प्रांजलीला भेटत तेव्हा त्यांनी तिच्यात कोणते बदल होत आहेत किंवा कोणते होणे आवश्यक आहेत याचा अंदाज घेत असत. काऊन्सेलरशी मनमोकळा संवाद जसा तिने साधायला सुरुवात केली तशी तिची भावनिक गुंतागुंत उकलायला सुरुवात झाली. अभ्यासात कमी असल्याने आधीच असलेला न्यूनगंड डिप्रेशनच्या रूपानी तिच्या वाट्याला आला. नंतर दाबून ठेवलेल्या सर्व भावना उफाळून वेगळेच स्वरुप धारण करून मेनियाच्या स्वरुपात बाहेर पडत होत्या. भास, भ्रम, संशय वगैरे स्किझोफ्रेनियाची लक्षणे या सगळ्यांचे मिश्रण होऊन स्किझोअफेकटीव डिसऑर्डर प्रांजलीला झाली होती. तिला वढ्या विस्तारानी स्वत:चा आजार काळात नसला तरी आपल्याला मानसिक

आजार आहे आणि औषधे घेतल्याशिवाय आपण व्यवस्थित राहू शकत नाही हे तिला समजले. समुपदेशनाने तिचे विचार, नातेसंबंध व भावना यावर काम सुरु झाले. तिला ग्रुप थेरपी सेंटर मध्ये पाठवण्यात येऊ लागले. तिथे सोपी कामे ती सराईतपणे करत होती. पण नवीन गोष्टी शिकताना तिला अडचणी येत असत. पण तिच्या कलेने जे जे शक्य होतं ते काम तिला शिकवले गेले. तिचा कामाचा उत्साह कमी जास्त होत असतो पण तिला काम करण्याची इच्छा व आनंद मिळू लागला आहे. पुरेशी सुधारणा झाल्यावर प्रांजलीचा डिस्चार्ज केला गेला. भावाने औषधांची व ओपीडीची जबाबदारी अगदी चोखपणे सांभाळली आहे. आज चार वर्षापासून भावासोबत नियमितपणे ओपीडीवर उपचार घेत आहे. गोळ्यांचे प्रमाण पूर्वीपेक्षा खूप कमी झाले आहे. प्रांजलीने वहिनीच्या देखरेखीखाली स्वत:चा टेलरिंगचे काम सुरु केलेला आहे. उत्तम प्रकारे त्यात ती प्रगती करत आहे. अशी ही आजारांनी खचलेली प्रांजली आज पुन्हा उभारी घेण्याची हिम्मत दाखवत आहे. तिला आमच्या शुभेच्छा!

**स्किझोअफेक्टीव्ह डिसऑर्डर हि स्किझोफ्रेनिया व मूड डिसऑर्डरची लक्षणे एकत्र उद्धभल्यामुळे होते. यात स्किझोफ्रेनियाची लक्षण जसे कि,**

- भास होणे.
- भ्रम किंवा ठाम गैरसमज होणे.
- विचित्र वर्तन होणे.
- प्रसंगानुरुप भावना वाटत आणि व्यक्त करता न येणे.
- स्वत:ची काळजी घेता येत नाही जसे कि स्वच्छता राखणे इ.

**मूड डिसऑर्डरमध्ये खालील लक्षणे आढळतात.**

- अतिउत्साह वाटणे, ज्यामुळे खूप बोलणे, खर्च करणे, देवाचे करणे, फिरणे, मोठ्या गप्पा मारणे इ. होते किंवा
- अतिउदासी वाटणे, ज्यामुळे काम न करणे, ज्या गोष्टींमध्ये आधी उत्साह होता तो न वाटणे.
- भावनिक आंदोलने होतात, ज्यामुळे वागण्या, बोलण्यात व विचारांमध्ये बराच फरक पडतो.